दै. देशोन्नती दि. 06-10-24

# दरोडा गुन्ह्यातील चार आरोपींच्या विमानतळ पोलीसांनी आवळल्या मुसक्या

देशोन्नती वृत्तसंकलन

## सव्वा तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत विमानतळ पोलिसांनी १ ऑक्टोबर रोजी केलेल्या कारवाईत दरोडा प्रकरणातील चौघांच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून ११ मोबाईल व दोन मोटारसायकली असा एकूण ३ लाख २७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

विमानतळ हद्दीत माळटेकडी ब्रिजच्याखाली सहा आरोपीतांनी १ ऑक्टोबर रोजी संगणमत करून खंजरचा धाक दाखवुन दरोडा घातला होता. सदर गुन्हयात मोबाईल जबरीने चोरून नेल्याने पोस्टे विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा तपासा संबंधाने गुन्हे शोध पथक हे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असतांना शेख इलीयास शेख ईरफान(२३)रा. पाकीजानगर नांदेड, मोहम्मद फेरोज मोहम्मद हमीद(१९)वर्षे, रा. खुदबेनगर, शेख शाहेद रा. देगलुर नाका व तीन विधीसंघर्ष बालक यांनी सदर गुन्हा केल्याचे समजले. त्यावरून गुन्हे शोध



पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांनी यातील आरोपीना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांचे ताब्यातुन चोरीस गेलेला मोबाईल, दोन मोटारसायकली व दहा वेगवेगळ्या कंपणीचे मोबाईल असा एकुण ३ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल व एक खंजर जप्त करण्यात आला आहे. दोन आरोपी फरार असुन त्यांचा पण शोध घेणे चालु आहे. सदरचा गुन्हा घडल्या नंतर १२ तासाचे आत चार आरोपीतांना ताब्यात घेतले असुन त्यात दोन सज्ञान असुन दोन विधीसंघर्ष बालक आहेत. या पथकात पोनि गणेश चव्हाण, पोउपनि विनोद साने, गुन्हे शोध पथकाचे पोहेकॉ दारासिंग राठोड, शेख जावेद, शेख शोएब, राजेशमाने, हरप्रितसिंघ सुखई, नागनाथ स्वामी, दिगंबर डोईफोडे, चालक पोउपनि गोरख भोसीकर यांचा समावेश होता.